महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचें कार्यालय
१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१
दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/उमाशि/रासेयो/पुवि/१६-१७/ ९७१ दि.- / /२०१ 6 FEB 2017

प्रति,
सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक,
कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर / सोलापूर.

विषयः- राष्ट्रीय सेवा योजना राबविणा-या
कनिष्ठ महाविद्यालयांची माहितीबाबत.

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, राष्ट्रीय सेवा योजना संबंधी वेळोवेळी मागितलेली माहिती अनेक कनिष्ठ महाविद्यालयांकडून वेळेत प्राप्त होत नाही, ही गंभीर बाब आहे. तरी सहामाही अहवाल, विद्यार्थी यादी, बँक खातेविषयक सविस्तर माहिती तसेच कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षित / अप्रशिक्षित विषय माहिती अद्याप अनेक कनिष्ठ महाविद्यालयांकडून अप्राप्त आहे. याबाबत या कार्यालयाकडून तसेच विभागीय व जिल्हा समन्वयकांकडून वारंवार सूचना देवून सुध्दा वेळेत कोणतीही माहिती प्राप्त होत नाही, ही बाब गंभीर आहे. तरी सर्व प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी यांनी त्वरीत याबाबत योग्य ती दखल घेवून सर्व प्रकारची माहिती यापुढे राष्ट्रीय सेवा योजना बाबत शनिवार दि.११.०२.२०१७ पूर्वी विभागीय / जिल्हा समन्वयक यांना त्वरीत पाठविण्यांची दक्षता घ्यावी. तसेच सर्व माहिती एम एस एक्सेल या फॉरमॅट मध्ये टाईप करुन bkchavan2014@gmail.com या ईमेल आयडीवर सुध्दा पाठवावी.

उपरोक्त बाबत माहिती वेळेत प्राप्त न झाल्यास, संबंधित प्राचार्य / मुख्याध्यापक हे जबाबदार राहतील , याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

MRaut
6.2.17
समन्वयक (रासेयो) तथा
सहायक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे कार्यालय